बीच कॅन्डीवरची भुलाभाई देसाई इन्स्टिटयूट बंद झाल्यामुळे बेघर झालेल्या सत्यदेव दुबेच्या 'थिएटर युनिट'ला विनोद दोशीने वालचंद टेरेसच्या तळमजल्यावर आसरा दिला. मग दुबेने नव्या झपाटयाने कामाला सुरूवात केली. ग्यानदेव अग्निहोत्री लिखित 'शुतुरमुर्ग' हाती घेतलं. ("इंग्रजी नाटयसृष्टीच्या उच्चभ्रू परिसरातून सत्यदेव आधीच बाजूला झाला होता; 'अंधायुग' आणि 'ययाती' सारख्या मुंबईतल्या नाटकवेडया मराठी समाजाशी जवळीक साधणा-या हिंदी नाटकांकडे वळला होता. ताडदेव ते हाजी अलीसारखा हमरस्ता आणि आजूबाजूचा मध्यमवर्गीय परीसर त्याला जास्त जवळचा वाटला", असं मत 'थिएटर युनिट'मधला दुबेचा अत्यंत जवळचा आणि जुना स्नेही अब्दुल शकूर याने माझ्याकडे व्यक्त केलं होतं.) 'शुतुरमुर्ग'चे दोनतीन प्रयोग झाले असतील नसतील तेवढयात दुबेने सुलभा देशपांडेला 'चुप! कोर्ट चालू है!"च्या तालमी सुरू करायला सांगितल्या.

मुंबईच्या तेजपाल ऑडिटोरियम मध्ये झालेल्या 'चुप कोर्ट..'च्या पहिल्या प्रयोगानंतर मी वालचंदच्या लांबलचक आयताकृती हॉलमध्ये बसलो होतो. येरझारा घालताना मध्येच थांबून दुबेने, बाजूला कायमच अस्ताव्यस्त पसरलेल्या वर्तमानपत्रांतून Times of India मध्ये ज्ञानेश्वर नाडकर्णींनी लिहीलेले नाटयपरीक्षण मला वाचायला सांगितलं. त्यात उल्लेख केलेल्या माझ्या suave presence बद्दल "म्हणजे काय?" असं मी विचारल्यावर तो हसून म्हणाला, "यानी अब ॲक्टिंग सीखनेके क़ाबिल हो गये हो!" हे म्हणताना हॉलमधल्या आडनिडया जागच्या खांबाला टेकून उभा असलेला पोरसवदा दुबे मला आजही लखलखीत दिसतो.

त्या नाटकाच्या राज्यनाटयस्पर्धेतल्या (हिंदी) नागपूरच्या विजयी प्रयोगानंतर, दुबेने लगेच आद्य रंगाचार्यांचं 'सुनो जनमेजय' हे नवीन नाटक बसवायला घेतलं. एका नाटकाची पुंजी गाठीशी असलेला मी आणि नाटकात पहिल्यांदाच काम करणारी नीला भागवत, अशा दोन नवशिक्या नटांना प्रमुख भूमिकांसाठी तयार करायचं शिवधनुष्य उचलण्यासाठी 'जनमेजय'च्या तालमी दुबेने वेगळया पध्दतीने सुरू केल्या. नीलाची तालीम वालचंदच्या मध्यवर्ती केबिनमध्ये तर माझी कोप-यातल्या खोलीत, अशा दोन वेगवेगळया खोल्यांत दुबेने आमच्या तालमी घ्यायला सुरूवात केली. उभं कसं राहायचं, चालायचं कसं, बोलायचं कसं, ऐकायचं कसं अशा मूलभूत गोष्टींपासून ते pitch आणि volume मधला फरक काय, आरडाओरडा न करता आवाजाची फेक दूरवर कशी पोचवायची किंवा हातांचं काय करायचं, शारीरबोली म्हणजे काय, अशा नेमक्या गोष्टी आम्हा दोघांकडून घोटवून घ्यायला लागला. एक तासभर या गोष्टी अंगवळणी पडाव्यात यासाठी निरनिराळे exercises करून घेतल्यावर, नंतरचा अर्धाएक तास आम्हाला 'जनमेजय'च्या सुरूवातीला असलेली

आपापली स्वगतं पाचसहा वेळा perform करायला लावायचा. त्याचवेळी बाहेरच्या हॉलमध्ये, थिएटर युनिटचा हुकमी एक्का अमरीश पुरी आणि गुजराथी रंगभूमीवरचा प्रतिथयश अभिनेता–दिग्दर्शक कांती मडिया यांच्या सीन्सच्या तालमीत दुबे गर्क असायचा; अर्थात, त्याचा एक कान मात्र माझ्या बंद खोलीकडे आणि दुसरा कान नीलाच्या बंद केबिनकडे असायचा. स्वगतांच्या चढउतारात किंवा लयीत जराशा जरी फरक झाला तरी दुबे लगेच तिथे हजर व्हायचा. त्याच्या शीघ्रकोपी स्वभावाबद्दल आधीच पुरीसाहेबांकडून भरपूर ऐकलं असल्यामुळे आणि नंतरच्या काळात संतापल्यावर हातातली पट्टी किंवा एकदा तर चक्क खुर्ची फेकल्याचं बघितलेलं असल्यामुळे, वालचंद टेरेसमधल्या आमच्या तालमी एका दडपणाखाली चालायच्या.

थोड्याच कालावधीत, थिएटर युनिटने हिंदीच्या बरोबरीने मराठीतही नाट्यनिर्मिती करायला सुरूवात केली. ‘स्टीलफ्रेम’, ‘आधे अधूरे’, ‘पगला घोडा’, ‘गिधाडे’, ‘वल्लभपूरची दन्तकथा’, ‘हयवदन’, ‘अनुष्ठान’, ‘अच्छा एक बार और’, ‘पुनश्च हरीओम’, ‘संभोगसे सन्यास तक’ सारखी अनेक महत्वाची नाटकं उभी राहयलेली वालचंद टेरेसने पाहिली. बघता बघता, ही वास्तू समांतर नाट्यचळवळीचा एक अत्यंत महत्वाचा केंद्रबिंदू बनली. ‘चुकला फकीर मशीदीत’ या चालीवर प्रायोगिक नाटकाशी संबंधित माणसांची पावलं संध्याकाळी वालचंद टेरेसला वळायची. तेंडुलकर, खानोलकर, कार्नाडांसारखे नाटककार, श्रीराम लागू, अरविंद–सुलभा देशपांडे, दीना पाठक, तरला मेहता, पर्ल पदमसीसारखी विविधभाषिक नटमंडळी, धर्मवीर भारती, भवानीप्रसाद मिश्रांसारखे कवी, कुमुदबेन आणि अरविंदभाईसारखे कलाप्रेमी, वासुदेव गायतोंडे, तय्यब मेहता, अकबर पदमसीसारखे चित्रकार, शमीम अहमद, जितेन्द्र अभिषेकीसारखे वादक–गायक, कलकत्त्याचे बादल सरकार, श्यामानंद जालान, प्रतिभा अग्रवालसारखे नाट्यकर्मी आणि दिल्लीचे राजिंदरनाथ, सई परांजपे यांच्यासारखे दिग्दर्शक, नाटकाला वाहिलेलं Enact हे अप्रतिम मासिक चालवणारा राजेन्द्र पॉलसारखा कलंदर संपादक... अशा अनेकांच्या वावराने ती वास्तू चिंब झाली होती. नाटकांच्या तालमीव्यतिरिक्त नाट्यवाचन, काव्यवाचन, मुंबई मधल्या सांस्कृतिक घडामोडींवर खडाजंगी चर्चा–समीक्षा अशा रोज तिथे घडत असलेल्या भरगच्च कार्यक्रमांचा साक्षी, तो आडनिड्या जागीचा खांब होता! आणि फक्त तोच नाही तर वालचंदचा प्रत्येक कोनाकोपरा जेव्हा संध्याकाळच्या मैफिलीत उजळून निघायचा तेव्हा बाहेरचा कोलाहल, क्षुल्लक जगरहाटीत विरून गेलेला असायचा.

- **अमोल पालेकर**